सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : १२० | मंगळवार, दि. २० जानेवारी २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

## आजचे अभीष्टचिंतन




श्री. जितेंद्र पाटील
पत्रकार


श्री. सुनील महाजन
सहकार विभाग


श्री. उदयकुमार खैरनार
पॅथॉलॉजिस्ट


सौ. निशा जिवनानी
कापड व्यापारी


डॉ. कौस्तुभ ठाकूर
दृष्टी हॉस्पीटल, अमळनेर


श्री. प्रमोद वाणी
अमळनेर


श्री. गौरव चौधरी
व्यापारी


हुनैद कलकत्तावाला
व्यापारी

## ब्रह्म मुहूर्तावरील स्नान...



*अमळनेर : माघ मेळ्यांतर्गत मौनी अर्थात पौष अमावास्येनिमित्त ब्रह्म मुहूर्तावर मुख्य स्नान उत्सवाला अतिशय महत्त्व आहे. त्या अनुषंगाने प्रयागराज (उत्तर प्रदेश) येथे रविवार, दि. १८ जानेवारीपासून सोमवार, दि. १९ जानेवारी २०२६ च्या सकाळी ८.०० वाजेदरम्यान जवळपास दीड कोटी भाविकांनी गंगा आणि संगमात स्नान केले. यापुढील गंगा आणि संगमावरील स्नान २३ जानेवारी–वसंत पंचमी, १ फेब्रुवारी– माघ पौर्णिमा व १५ फेब्रुवारी २०२६–महाशिवरात्रीच्या पावन मुहूर्तावर भाविकांकडून मोठ्या संख्येने केले जाईल. या ब्रह्म मुहूर्तावरील स्नानाला हिंदू धर्मात अत्यंत महत्त्व दिले जाते.*

# पालिकेच्या समिती सभापतींची निवड

## शिवसेनेच्या दोन, तर तीन अपक्षांना संधी; विरोधी गटाचे लाभले पूर्ण सहकार्य






*अमळनेर : पालिकेच्या विविध विषय समिती सभापती निवडीप्रसंगी उपस्थित नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर, प्राताधिकारी तथा पीठासन अधिकारी मयूर भंगाळे, उपनगराध्यक्ष प्रशांत निकम व नवनिर्वाचित समितीचे सभापती. दुसऱ्या छायाचित्रात मुख्याधिकारी गणेश शिंदे यांचा सत्कार करताना नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर, उपनगराध्यक्ष प्रशांत निकम, नगरसेवक व मान्यवर.*

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील पालिकेच्या विविध विषय समिती सभापतींची सोमवार, दि. १९ जानेवारी रोजी निवड करण्यात आली आहे. पालिकेच्या सभागृहात विशेष सभेत शिवसेना, अपक्षांचा गट व शविआच्या नगरसेवकांनी एक मताने ही निवड प्रक्रिया पार पडली.

प्रांताधिकारी मयूर भंगाळे पीठासन अधिकारी होते. मुख्याधिकारी गणेश शिंदे यांनी त्यांना सहकार्य केले. विविध समित्यांमध्ये शिवसेनेला दोन, तर तीन अपक्षांना सभापतिपदाची संधी देण्यात आली आहे. दरम्यान, या निवडीसाठी शविआ आघाडीच्या सर्व सदस्यांनी सत्ताधारी गटाला पूर्ण सहकार्य केले. त्यामुळे अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात संपूर्ण निवड प्रक्रिया पार पडली. स्थायी समिती पदसिद्ध सभापतिपदी नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर यांची, तर नियोजन व विकास समिती सभापतिपदी पदसिद्ध उपनगराध्यक्ष प्रशांत निकम यांची निवड करण्यात आली आहे. तसेच स्थायी समितीत सदस्य म्हणून शिवसेनेकडून श्रीराम चौधरी, अपक्ष गटाकडून महेश देशमुख व शहर विकास आघाडीकडून भरतकुमार ललवाणी यांची निवड करण्यात आली. याप्रसंगी शिवसेनेचे गटनेते पंकज चौधरी, नगरसेवक डॉ. डीगंबर महाले, मोहन सातपुते, दीपक चौगुले, सुयोग धनगर, अनिल महाजन, सचिन कासार, प्रवीण पाटील, प्रताप साळी, नगरसेविका सौ. कल्पना परदेशी, सौ. सविता संदानशीव, सौ. अपूर्वा चौधरी, सौ. छाया पाटील, सौ. पुष्पा भोई, सौ. सुवर्णा हटकर, सौ. नीलिमा पाटील, सौ. इर्शाद तडवी, सौ. रूपाली भोई, सौ. शोभाबाई गढरे आदी उपस्थित होते.


साहेबराव पवार | नाविद शेख | रामकृष्ण पाटील | कैलास पाटील | स्वाती परदेशी

### विविध समितीनिहाय सभापतींची नावे अशी

सार्वजनिक बांधकाम समिती सभापती– साहेबराव पवार (शिवसेना), शिक्षण, क्रीडा व सांस्कृतिक समिती सभापती– नाविद शेख (शिवसेना), स्वच्छता वैद्यक आणि सार्वजनिक आरोग्य समिती सभापती– रामकृष्ण बापूराव पाटील (अपक्ष), पाणीपुरवठा व जलनिस्सारण समिती सभापती– कैलास नामदेव पाटील (अपक्ष) महिला व बालकल्याण समिती सभापती– स्वाती सूरजसिंग परदेशी (अपक्ष).

### दोन्ही गटांची मैत्रीपूर्ण बैठक

बुधवार, दि. १४ जानेवारी रोजी झालेल्या पालिकेच्या पहिल्याच बैठकीत सत्ताधारी गट व शहर विकास आघाडीचा गट यांच्यात वादंग झाला होता. त्यावेळी नगरसेवक डॉ. डिगंबर महाले यांनी यापुढे पालिकेच्या प्रत्येक मिटिंगपूर्वी दोन्ही गटांच्या प्रतिनिधींची समन्वयक बैठक व्हावी. त्यातून कोणत्याही प्रकारचा वाद होणार नाही असे सन्मानजनक तोडगे काढावेत, असे आवाहन केले होते. त्याप्रमाणे आज नगराध्यक्षांच्या दालनात सकाळी दोन्ही गटांचे प्रतिनिधी सभापती निवड प्रक्रियेसंदर्भात एकत्र बसले. दोघांमध्ये सकारात्मक चर्चा झाली. परिणामी कोणताही वादंग न होता किंवा शविआतर्फे कोणाचाही उमेदवारी अर्ज दाखल न होता प्रक्रिया बिनविरोध व सुरळीत पार पडली.



*अमळनेर : आगार निरीक्षक अनिकेत नायर यांना निवेदन देताना नगरसेवक मोहन सातपुते, मुन्ना शर्मा व उपस्थित नागरिक.*

# म्हाडा कॉलनीत बसला थांबा द्यावा

## आगार निरीक्षकांना नागरिकांचे निवेदन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : धरणगाव रस्त्यावरील म्हाडा कॉलनीत बसला थांबा मिळावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. याबाबत सामाजिक कार्यकर्ते व नागरिकांतर्फे सोमवार, दि. १९ जानेवारी रोजी आगार निरीक्षक अनिकेत नायर यांना निवेदन देण्यात आले आहे.

जळगावकडून अमळनेर (धरणगाव व्हाया टाकरखेडा) येणाऱ्या प्रत्येक बसला म्हाडा कॉलनी येथे थांबा द्यावा. त्यामुळे म्हाडा कॉलनीतील नागरिकांची सोय होईल. प्रशासनाने याबाबत लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घ्यावा. याप्रसंगी नगरसेवक मोहन सातपुते, मुन्ना शर्मा, गणेश चौधरी, अतुल केदार, अजय पवार आदींसह म्हाडा कॉलनीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मोफत मोतिबिंदू शस्त्रक्रियेसाठी ७४ रूग्ण पनवेल येथे रवाना

## मंगळग्रह सेवा संस्थेचा स्तुत्य उपक्रम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील मंगळ ग्रह सेवा संस्था, ना. गुलाबरावजी पाटील सोशल फाउंडेशन (पाळधी), संकल्प सेवा फाउंडेशन (धनवाडी) व आर. झुणझुणवाला शंकरा आय हॉस्पिटल (पनवेल) यांच्यातर्फे रविवार, दि. १८ जानेवारी रोजी मंगळ ग्रह मंदिरात मोफत मोतीबिंदू तपासणी शिबिर झाले. या शिबिराचा १९० रुग्णांनी लाभ घेतला. त्यापैकी ७४ रुग्ण मोतिबिंदू शस्त्रक्रियेसाठी पात्र ठरले होते. या रूग्णांना सोमवार, दि. १९ जानेवारी रोजी सकाळी श्री मंगळग्रह मंदिर येथून विशेष वाहनाने आर. झुणझुणवाला शंकरा आय हॉस्पिटल (पनवेल) येथे शस्त्रक्रियेसाठी रवाना करण्यात आले




*अमळनेर : पनवेल येथे मोफत शस्त्रक्रियेसाठी रवाना होताना रुग्ण.*

या शिबिरात अमळनेर, धुळे, चोपडा, जळगाव, एरंडोलसह तालुक्यातील ग्रामीण भागातील रूग्णांचा सहभाग होता. डॉ. मोहसीन सय्यद, विजय बामणे, सागर पाटील, अवंतिका गलांडे, प्रतिक्षा महाले (नेत्ररोग तज्ज्ञ, शंकरा आय हॉस्पिटल, पनवेल) यांनी तपासणी केली होती.

मंगळ ग्रह सेवा संस्थेचे उपाध्यक्ष एस. एन. पाटील, सहसचिव दिलीप बहिरम, विश्वस्त अनिल अहिरराव, जनसंपर्क अधिकारी रजनीकांत पाटील, गणेश शिंपी, प्रमोद पाटील, भूषण पाटील, मयूर चौधरी, किरण पाटील, वाल्मिक पाटील आदींनी सहकार्य केले. दरम्यान, सदर शिबिर दर महिन्याच्या तिसऱ्या रविवारी श्री मंगळ ग्रह मंदिर येथे नियमितपणे होते, याचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे मंगळ ग्रह सेवा संस्थेतर्फे आवाहन करण्यात आले आहे.




# डॉक्टरी छोड़ यूपीएससी पर साधा निशाना

## पहली बार में आयपीएस बनकर गाड़ दिया झंडा

**सक्सेस स्टोरी**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

बिहार के अरवल जिले को पहली बार महिला पुलिस अधीक्षक मिली है। आईपीएस डॉ. नवजोत सिमी को राज्य सरकार ने एस.पी.अरवल बनाकर भेजा है। डॉ. नवजोत सिमी ने कार्यभार संभाल लिया है। पंजाब की रहने वाली डॉ. नवजोत सिमी २०१८ बैच की आयपीएस अधिकारी हैं। उन्होंने सिविल सेवा में आने के लिए मेडिकल जैसा शानदार करियर छोड़ दिया। देश की डॉ. नवजोत सिमी का जन्म पंजाब के गुरदासपुर में २१ दिसंबर १९८७ को हुआ।

### अरवल की नई एसपी

बिहार के अरवल जिले को पहली बार महिला पुलिस अधीक्षक मिली है। आईपीएस डॉ. नवजोत सिमी को राज्य सरकार ने एस.पी. अरवल बनाकर भेजा है। डॉ. नवजोत सिमी ने कार्यभार संभाल लिया है।

### २०१८ बैच की आईपीएस

पंजाब की रहने वाली डॉ. नवजोत सिमी २०१८ बैच की आयपीएस अधिकारी हैं। उन्होंने सिविल सेवा में आने के लिए मेडिकल जैसा शानदार करियर छोड़ दिया।

### पहले प्रयास में आईपीएस

डॉ. नवजोत सिमी का जन्म पंजाब के गुरदासपुर में २१ दिसंबर १९८७ को हुआ। उन्होंने अपने पहले प्रयास में वर्ष २०१८ में यूपीएससी परीक्षा पास कर ली।

### बीडीएस की डिग्री

उन्होंने लुधियाना में बाबा जसवंत सिंह डेंटल हॉस्पिटल एंड रिसर्च इंस्टीट्यूट से बैचलर ऑफ डेंटल सर्जरी (बीडीएस) की डिग्री हासिल की। उन्हें कुछ बड़ा करना था इसलिए डॉक्टरी पेशे की बजाय उन्होंने यूपीएससी की राह चुनी।

### ७३५ रैंक

यूपीएससी सीएसई परीक्षा में ७३५ रैंक लाकर डॉ. नवजोत आईपीएस बन गईं। डॉ. नवजोत युवाओं के बीच काफी लोकप्रिय हैं और सोशल मीडिया पर उनकी गजब की फॉलोइंग है।

### पति हैं आईएएस

आईपीएस नवजोत सिमी के पति तुषार सिंगला आईएएस अधिकारी हैं। तुषार भी पंजाब से हैं और बंगाल कैडर में पोस्टेड थे। अब वह भी बिहार कैडर में आ गए हैं।

### इन पदों पर रहीं

डॉ. नवजोत की पहली पोस्टिंग पटना में पुलिस उपाधीक्षक (डीएसपी) के रूप में हुई थी। फिर वह कमांडेंट बिहार विशेष सशस्त्र पुलिस-१९, बेगूसराय भी रहीं।



# बाल्कनीत कधीच येणार नाही कबूतर असा उपाय

## २ रुपयांची साधी काळी गोष्ट करेल मदत

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

बाल्कनीत कबुतरांचा त्रास हा आजकाल शहरांमधील अनेक घरांचा मोठा प्रश्न बनला आहे. कबुतरांमुळे घाण, पिसे, विष्ठा यामुळे केवळ अस्वच्छता वाढत नाही, तर आरोग्याच्या समस्याही उद्‌भवून शकतात. अनेक लोक जाळी, काटे, केमिकल स्प्रे अशा उपायांचा वापर करतात, मात्र हे उपाय महागडे, त्रासदायक किंवा कधी-कधी धोकादायकही ठरू शकतात. अशा वेळी एक साधा, स्वस्त आणि नैसर्गिक उपाय खूप प्रभावी ठरतो. काळी प्लास्टिक पिशवी.

काळ्या प्लास्टिकच्या पिशव्यांना फुगवून बाल्कनीत लटकवणे हा खूप सोपा आणि प्रभावी उपाय आहे. पिशव्या हवेच्या हलक्या हालचालीमुळे हलत राहतात. ज्यामुळे कबुतरांना बाल्कनीत बसणे किंवा अन्न शोधणे सुरक्षित वाटत नाही. हलत्या आणि अर्ध प्रतिबिंबित पिशव्यांमुळे कबूतर घाबरतात आणि दूर जातात. ही पद्धत केवळ रासायनिक नसलेली आहे, तर घरात कोणताही धोका देखील नाही. याबरोबर काही चमकदार वस्तू जसे जुने सीडी तुकडे किंवा ॲल्युमिनियम फॉइलच्या पट्ट्या पिशव्यांसोबत लटकवल्यास प्रतिबिंब आणि हालचालींचा परिणाम अधिक प्रभावी होतो. त्यामुळे बाल्कनीत कबुतरांची उपस्थिती कमी होते आणि दीर्घकाळासाठी त्यांना दूर ठेवता येते. ही पद्धत नियमित वापरल्यास बाल्कनी स्वच्छ राहते आणि घरातील वातावरण आरोग्यदायी राहण्यास मदत होते.

**काळी प्लास्टिक पिशवी कशी करते काम?**

कबुतरांची नजर अतिशय संवेदनशील असते. हालचाल करणाऱ्या, चमकणाऱ्या किंवा अनोळखी आकाराच्या वस्तूंमुळे ती घाबरतात. काळी प्लास्टिक पिशवी वाऱ्यामुळे हलते, फुगते आणि वेगवेगळे आकार घेते. कबुतरांना ती एखाद्या धोकादायक प्राण्यासारखी किंवा अडथळ्यासारखी भासते. त्यामुळे ती त्या जागेपासून दूर राहतात.

**हा उपाय इतका प्रभावी का ठरतो?**

कबुतरे साधारणपणे शांत, सुरक्षित आणि स्थिर ठिकाणी घरटी बांधतात. ज्या ठिकाणी सतत हालचाल दिसते तेथे ती थांबत नाहीत. काळी प्लास्टिक पिशवी सतत हलत असल्याने कबुतरांना असुरक्षित वाटते. विशेष म्हणजे हा उपाय पूर्णपणे नैसर्गिक आहे.

- केमिकलमुक्त आणि पर्यावरणास सुरक्षित आहे.
- काळी प्लास्टिक पिशवी वापरण्याची योग्य पद्धत
- जाड आणि मोठी काळी प्लास्टिक पिशवी घ्या.
- पिशवीत थोडी हवा भरून तोंड घट्ट बांधा.
- बाल्कनीच्या कठड्यावर, खिडकीजवळ, किंवा कबूतर जेथे बसतात तेथे दोरीच्या सहाय्याने ती लटकवा.
- पिशवी अशी लावा की ती वाऱ्याने सहज हलू शकेल.
- २३ पिशव्या वेगवेगळ्या ठिकाणी लावल्यास परिणाम अधिक चांगला दिसतो.

**किती दिवसांत परिणाम दिसतो?**

बहुतेक वेळा २३ दिवसांतच कबुतरे त्या जागी येणे बंद करतात. काही हट्टी कबुतरांसाठी थोडा अधिक वेळ लागू शकतो. पण सातत्य ठेवल्यास हा उपाय नक्कीच यशस्वी ठरतो. कोणतेही केमिकल किंवा विषारी पदार्थ वापरावे लागत नाहीत.

- खर्च अगदी नगण्य
- कबुतरांना इजा होत नाही
- घरातील लहान मुले आणि पाळीव प्राणी सुरक्षित
- सहज आणि पटकन करता येणारा उपाय

**छत किंवा बाल्कनी स्वच्छ ठेवा**


- कबुतरांना अन्न आणि ठावठिकाणी आराम मिळणे हे आवडते.
- बाजूची घाण, अन्नाचे तुकडे, फळे किंवा साखर असलेले पदार्थ लांब ठेवा.
- स्वच्छतेमुळे ते लगेचच दुसऱ्या ठिकाणी जाण्याची शक्यता वाढते.

**नैसर्गिक दुर्गंधी वापरा**

- मिरे, लाल मिरी, लिंबाचा रस किंवा नारळाचे तेल यांचा वापर करून त्यांना दूर ठेवता येते.

हे उपाय केवळ थोड्या ठिकाणी वापरा. जेणे करून तुमच्या बागेतील फुलांना किंवा वनस्पतींना त्रास होणार नाही.





# तुम्हाला माहिती आहे का माणसाचे अश्रू ३ प्रकारचे असतात?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

केवळ रडणे-हसणे आणि डोळ्यांतून पाणी येणे म्हणजे अश्रू का? अश्रू येणे याचा संबंध मानवी भावनांशी जरी जोडलेला असला, तरी यामागे वैज्ञानिक कारणही दडलेले आहे. मुळात अश्रू डोळ्यांच्या कोणत्या भागात तयार होतात व यापाठीमागे काय कारण असते हे जाणून घेऊ. अश्रू हे शरिरातील लॅक्रीमल ग्रंथीमध्ये तयार होतात. या ग्रंथी डोळ्यांच्या समोरच्याच भागावर असतात.
तज्ज्ञांच्या मते अश्रू ३ प्रकारचे असतात.

**१) बेसल टिअर**

हे अश्रू नेहमी आपल्या डोळ्यांतच राहतात व आपल्या डोळ्यांमध्ये ओलावा टिकून राहतो.

**२) रिफ्लेक्स टिअर**

या अश्रूचे काम म्हणजे माणसाच्या डोळ्यांत जेव्हा कचरा, धूळ किंवा तिखट जाते त्यावेळी डोळ्यांची सफाई करण्याचे काम यांचे असते.

**३) भावनिक अश्रू**

हे अश्रू, वेदना, दुखः, भीती किंवा भावनांची उलथापालथ यामुळे येत असतात. हे भावनिक अश्रू सर्वांत रहस्यमय असतात. या अश्रूंमध्ये स्ट्रेस हार्मोन्स व टॉक्सिन असतात. जे आपोआप बाहेर पडतात. त्यामुळे अश्रू ज्यावेळी बाहेर पडतात त्यावेळी मानसाच्या शरिराला व मनालाही हलके वाटते, तसेच हृदयाची गतीही सामान्य होते. यामुळे अश्रू येणे ही क्रिया शरिराची व मनाची सुरक्षा प्रणाली आहेत. अत्याधिक भावनांमुळे हे अश्रू वाहतात.

पण अती अश्रू येणे काही वेळा तुमच्यात तणाव, डिप्रेशन, मानसिक थकान यांची लक्षणे असल्याचे दर्शविते.

# पाकिस्तानात रचला गेला ३७ धावांचा लाजीरवाणा विक्रम

## २३२ वर्षे जुना रेकॉर्ड मोडला

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पाकिस्तानमध्ये देशांतर्गत प्रेसिडेंट्स ट्रॉफी २०२५-२६ स्पर्धा सुरू आहे. या स्पर्धेतील एका सामन्यात लाजीरवाण्या विक्रमाची नोंद झाली आहे. २३२ वर्षांचा विक्रम पाकिस्तानने मोडला आहे. काय झाले ते जाणून घेऊया.

पाकिस्तान आणि लाजीरवाणे विक्रम एक समीकरण आहे. गेल्या काही दिवसांत पाकिस्तानने याबाबत छाप पाडली आहे. पाकिस्तानात देशांतर्गत प्रेसिडेंट्स ट्रॉफी २०२५-२६ स्पर्धा सुरू आहे. या स्पर्धेतील १५ व्या सामन्यात पाकिस्तान टेलिव्हिजन संघाने ऐतिहासिक विजय नोंदविला. दुसरीकडे सुई नॉर्दर्न गॅस पाइपलाइन्स लिमिटेड संघाच्या नावावर लाजीरवाण्या विक्रमाची नोंद झाली आहे. या सामन्यात पाकिस्तान टेलिव्हिजन संघाने फक्त ४० धावांचे लक्ष्य ठेवले होते. पण सुई नॉर्दर्न गॅस पाइपलाइन्स संघाला फक्त ३७ धावा करता आल्या. इतके छोटे टार्गेट असूनही ते गाठणे काही जमले नाही. पाकिस्तान टेलिव्हिजन संघाने सुई नॉर्दर्न गॅस पाइपलाइन्स संघाचा २ धावांनी पराभव केला. प्रथम दर्जा क्रिकेटमधील सर्वांत छोटे टार्गेट राखण्यात प्रतिस्पर्धी संघाला यश मिळाले आहे. यासह २३२ वर्षे जुना विक्रम मोडीत निघाला आहे. यात १७९४ मध्ये इंग्लंडमध्ये झालेल्या सामन्यात ४१ धावांचा यशस्वीरित्या बचाव केला होता. तर आता फक्त ४० धावा रोखल्याने हा विक्रम मोडीत निघाला आहे.




### पीटीव्हीने या सामन्यात कमबॅक केले

या सामन्यात पीटीव्हीने पहिल्या डावात १६६ धावांची खेळी आणि दुसऱ्या डावात १११ धावा केल्या. एसएनजीपीएल संघाने पहिल्या डावात २३८ धावा केल्या आणि ७२ धावांची आघाडी घेतली. त्यामुळे चौथ्या डावात एसएनजीपीएल संघाला ४० धावांचे आव्हान मिळाले. पण इतके छोटे आव्हान असूनही पीटीव्हीच्या गोलंदाजांनी कमाल केली. त्यांनी एसएनजीपीएल संघाला फक्त ३७ धावांवर रोखले. यासह २ धावांनी ऐतिहासिक विजय मिळविला. यापूर्वी इंग्लंडमध्ये ओल्डफिल्डने १७९४ मध्ये ओल्डफिल्डमध्ये एमसीसीविरुद्ध ४१ धावांचे टार्गेट रोखत विजय मिळविला होता. हा सामना लॉर्डस् ओल्ड मैदानात खेळला गेला होता. २३२ वर्षांत कोणताही संघ इतके छोटे टार्गेट रोखू शकले नव्हते. पण पाकिस्तानच्या पीटीव्ही संघाने ही कामगिरी केली.

विशेष म्हणजे एसएनजीपीएल संघाचा कर्णधार शान मसूद आहे. त्याच्याकडे पाकिस्तानच्या कसोटी संघाची धुरा आहे. त्यामुळे त्याच्या कर्णधारपदावर टीका होताना दिसत आहे. संघाला लाजीरवाण्या पराभवापासून वाचवू शकला नाही. तर या विजयात फिरकीपटू अली उस्मानने भेदक गोलंदाजी केली. त्याने फक्त ९ धावा देत ६ गडी बाद केले. तर वेगवान गोलंदाज अमद बटने ४ विकेट घेतल्या. या दोघांनी एसएनजीपीएल संघाला ३७ धावांवर तंबूत पाठविले.

# नऊ लोकांच्या मालकीची आहे अर्धी मुंबई

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने (एसआरए) गेल्या वर्षी केलेल्या एका प्राथमिक सर्वेक्षणात काही मनोरंजक आकडेवारी समोर आली आहे. यानुसार केवळ नऊ खासगी जमीन मालक आणि खासगी ट्रस्ट ग्रेटर मुंबईमधील सुमारे ६,६०० एकर जमिनीवर नियंत्रण ठेवतात, जे पश्चिम उपनगरात कुलाबा ते दहिसरपर्यंत आणि पूर्व उपनगरात मुलुंडपर्यंत पसरलेले आहे.

### मुंबईत किती जागा राहण्यायोग्य

स्वप्नांचे शहर मुंबईचा एकूण भूभाग अंदाजे १.०७ लाख एकर आहे, त्यापैकी सुमारे ३४००० एकर क्षेत्र राहण्यायोग्य आहे. म्हणजेच या ९ संस्थांच्या मालकीची मुंबईच्या एकूण राहण्यायोग्य क्षेत्रापैकी १९.०४ टक्के किंवा मुंबईच्या एकूण निवासी क्षेत्राच्या जवळपास पाचवा भाग आहे.

### ३,००० एकर जमिनीवर झोपडपट्टीवासीयांचा ताबा

शहरानजीकच्या बोरीवली, कुर्ला आणि अंधेरी या तीन तालुक्यांमधील जमिनीच्या मालकीचा डेटा संकलित करणाऱ्या एसआरएला या ६,६०० एकर जमिनीपैकी अंदाजे ३,००० एकर जमिनीवर झोपडपट्टीवासीयांनी पूर्णपणे अतिक्रमण करून ताबा मिळवल्याचे आढळून आले आहे. राज्य सरकारने मुंबईतील पाच सर्वांत मोठ्या जमीन मालकांना इशारा दिल्यानंतर एसआरएने सर्वेक्षण करून परिस्थिती उघड केली. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत आपल्या जमिनीचा पुनर्विकास न केल्यास, सरकार अतिक्रमित जमीन ताब्यात घेईल, असा इशारा देण्यात आला होता.



### मुंबईतील सर्वांत मोठे जमीनदार कोण?

दस्तऐवजांनुसार गोदरेज अँड बॉयस, बायरामजी जीजीभॉय ग्रुप, ए. एच. वाडिया ट्रस्ट, एफ. ई. दिनशॉ ट्रस्ट, सर मोहम्मद युसूफ खोट ट्रस्ट, हिरजीभाई दिनशॉ बिलिमोरिया, जीजीभॉय अर्देशीर आणि व्ही. के. लाल व प्रतापसिंह सुरजी वल्लभदास खोट यांची कुटुंबे मुंबईतील सर्वांत मोठ्या जमीनदार पैकी आहेत. कुर्ला, भांडुप, विक्रोळी, देवनार, मालाड आणि गोरेगाव या भागांमध्ये जमिनी पसरलेल्या आहेत.

### मुंबईचा सर्वांत मोठा जमीनदार-गोदरेज प्रॉपर्टीज

मुंबईतील विक्रोळी परिसरातील एसआरएच्या सर्वेक्षणानुसार सर्वाधिक जमीन मालकांच्या यादीत गोदरेज कुटुंबाचा समावेश आहे. ज्यांच्याकडे ३,४०० एकरपेक्षा थोडी अधिक जमीन मालकीची आहे. ही जमीन विक्रोळीमध्ये ईस्टर्न एक्सप्रेस हायवेवर (ईईएच) असल्याचा अंदाज आहे. गोदरेज कुटुंबाच्या मालकीच्या सुमारे ३,४०० एकर जमिनीवर अनेक निर्बंध असल्यामुळे काही मर्यादा आहेत. पण या मर्यादांसह जमिनीचे मूल्य विचारात घेतल्यास सुमारे ३० हजार कोटी रुपये असू शकते आणि जमिनीवरील निर्बंध वगळल्यास त्याचे मूल्य ५० हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त होऊ शकते.

## कुणाच्या नावावर सर्वाधिक जमीन? बड्या जमीदारांसमोर टाटा-अंबानीही फिक्के

### एफ.ई. दिनशॉ ट्रस्ट

एफ.ई. दिनशॉ ट्रस्टकडे मुंबईत मालकीची सुमारे ६८३ एकर, दुसरी मोठी, जमीन असून सर्वेक्षणानुसार, या ट्रस्टच्या मालकीचे जमिनीचे भूखंड मालाड आणि आसपासच्या परिसरात आहेत.एफ.ई. दिनशॉ एक पारशी सॉलिसिटर-अर्थसहाय्यक आणि जमीनदार होते. ज्यांचे १९३६ मध्ये निधन झाले. दिनशॉ कुटुंबासाठी जमिनीचे मोठे भूखंड मागे सोडून गेले, जे वेळोवेळी सरकारद्वारे अधिग्रहित केले गेले किंवा त्यांचे रोखीत रूपांतर केले गेले.

### प्रतापसिंह वल्लभदास सुर्जी यांचे कुटुंब

मुंबईतील तिसरी सर्वात मोठी जमीन प्रतापसिंह वल्लभदास सुर्जी यांच्या कुटुंबाची आहे ज्यांच्याकडे मुंबईतील भांडुप परिसरात आणि आसपासच्या परिसरात सुमारे ६४७ एकर जमीन आहे.

### जीजीभॉय अर्देशीर ट्रस्ट

मुंबईतील चौथी सर्वात मोठी जमिनीची मालकी जीजीभॉय अर्देशीर ट्रस्टची असून मुंबईच्या चेंबूरमध्ये ५०८ एकर जमीन पसरली आहे.

### ए. एच. वाडिया ट्रस्ट

कुर्ला येथे या ट्रस्टच्या मालकीची ३६१ एकर जमीन असून प्रसारमाध्यमांच्या वृत्तानुसार २० व्या शतकाच्या सुरुवातीला मुंबई समाचार चालवणाऱ्या कामा कुटुंब या ट्रस्टचे व्यवस्थापन करायचे आणि चेंबूरमधील जवळपास एक तृतीयांश जमीन त्यांच्या मालकीची होती. प्रसारमाध्यमांच्या वृत्तानुसार १९ व्या शतकाच्या सुरुवातीला अर्देशीर होर्मुसजी वाडिया यांनी ३,५८७ रुपये वार्षिक भाड्याने कुर्ल्याची जमीन भाडेपट्ट्यावर घेतली होती. ज्यावर आता बहुतेक ठिकाणी अतिक्रमण झाले आहे.

### बायरामजी जीजीभॉय समूह

एसआरएच्या सर्वेक्षणानुसार बायरामजी जीजीभॉय ट्रस्टच्या मालकीची मुंबईच्या विविध भागांमध्ये २६९ एकर जमीन असून १९ व्या शतकातील पारशी परोपकारी सर बायरामजी जीजीभॉय यांना १८३० मध्ये ईस्ट इंडिया कंपनीकडून एकूण १२,००० एकरची सात गावे मिळाली होती. अहवालानुसार, वांद्रे येथील 'लँड्स एंड' ही जागा देखील त्यांच्या मालकीची होती, जेथे आता ताज हॉटेल उभे आहे.

### मुंबईत सरकारी अधिकाऱ्यांच्या मालकीचे भूखंड

अनेक खाजगी संस्थांसोबतच मुंबई पोर्ट ट्रस्ट, नॅशनल टेक्सटाइल्स कॉर्पोरेशन, महाराष्ट्र सरकार, केंद्र सरकार, सेंट्रल रेल्वे, वेस्टर्न रेल्वे यांसारख्या अनेक सरकारी संस्थांच्या मालकीचेही शहरातील जमिनीचे महत्त्वपूर्ण भूखंड आहेत.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

## दिनविशेष

२० जानेवारी

- पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी आशियातील पहिला अणुभट्टी देशाला समर्पित केला आणि अणुऊर्जा प्रतिष्ठान (आता भाभा अणु संशोधन केंद्र म्हणून ओळखले जाते) स्थापन करण्यात आले.
- संगीत क्षेत्रातील नोबेल समजला जाणारा पोलार संगीत पुरस्कार विख्यात सतारवादक पं. रविशंकर यांना जाहीर.
- गिरीश कर्नाड यांना ज्ञानपीठ पुरस्कार जाहीर.

**गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!

जय भारत...! जय स्वदेशी...!!

# बापरे... चांदीने किंमतीचे सर्व विक्रम मोडले!

## एक किलोचा दर चक्क एका वर्षाच्या पगाराएवढा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : भारतात चांदीच्या दरांनी नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. सोमवार, दि. १९ जानेवारी रोजी इतिहासात पहिल्यांदाच चांदीच्या दरांमध्ये विक्रमी वाढ झाली आहे. ही या दशकामधील सर्वात मोठी वाढ ठरली आहे. चांदीचा भाव अवघ्या एका महिन्यामध्ये २ लाख रुपये प्रती किलोवरुन ३ लाख रुपये किलोवर गेला आहे. नव्याने नोकरी लागणाऱ्यांना जेवढ्याचे वर्षिक पॅकेज दिले जाते तितके पैसे सध्या एक किलो चांदीसाठी मोजावे लागत आहेत. सामान्य बाजारामध्ये चांदीचा दर विक्रमी उच्चांकावर आहे. असे असतानाच मल्टी कमोडिटी एक्सचेंजमध्येही चांदीच्या दराने आतापर्यंतचा उच्चांक गाठला आहे. चेन्नई, हैदराबाद, बंगळूर, मुंबई, दिल्ली, चंदीगड आणि इतर भारतीय शहरांमध्येही चांदीच्या दरात मोठी वाढ झाल्याचे दिसून आले.

भारतातील चांदीचा दर सोमवार, दि. १९ जानेवारी रोजी भारतात चांदीच्या दरात प्रतिग्रॅम सुमारे १० रुपयांची वाढ झाली. चांदीचा दर ३०५ रुपये प्रति ग्रॅम झाला आहे. चांदीचा दर ३ लाख ५ हजार रुपये प्रति किलोपर्यंत गेला आहे. 'गुडरिटर्न्स'च्या आकडेवारीनुसार, १२ डिसेंबर रोजी देशांतर्गत चांदीच्या दराने इतिहासात पहिल्यांदाच २ लाख रुपयांचा टप्पा ओलांडला




होता. आता भारतात चांदीचा दर तीन लाखांवर पोहचला असून अंदाजे एका महिन्यात चांदीच्या दरता जवळपास एक लाख रुपयांची वाढ झाली आहे.

मल्टी कमोडिटी एक्सचेंज चांदीचा दर मल्टी कमोडिटी एक्सचेंजमध्ये चांदीच्या वायदे बाजारात देखील सोमवारच्या इंट्राडे ट्रेडिंग सत्रात मोठी वाढ दिसून आली. मल्टी कमोडिटी एक्सचेंज चांदी वायदा ३ लाख १ हजार ३१५ रुपये प्रति किलोच्या ५२ आठवड्यांच्या उच्चांकावर पोहोचला. दरम्यान, आंतरराष्ट्रीय चांदीच्या दरानेही आज विक्रम केला आहे. सोमवारी चांदीच्या दरात ४ टक्के पेक्षा जास्त वाढ होऊन दर ९४ डॉलर प्रति औंसवर पोहोचला.

चांदीचे दर वाढण्याचे कारण काय? चांदीच्या दरामध्ये विक्रमी वाढ होण्यासाठी राजकीय परिस्थिती कारणीभूत असल्याचे समोर येत आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ग्रीनलँडवर नियंत्रण मिळविण्याच्या प्रयत्नात आठ युरोपीय राष्ट्रांवर नवीन शुल्क लावण्याची धमकी दिल्यानंतर ही नवीन विक्रमी वाढ झाली.

**...म्हणून चांदीला दिर्घकाळ मागणी**

सध्याच्या चांदी हा सर्वात महत्त्वाच्या धोरणात्मक धातूंपैकी एक म्हणून उदयास येत आहे. गुंतवणुकीची मागणी आणि औद्योगिक उपकरणांमध्ये चांदीची मागणी वाढत आहे. भारतातही या दोन्ही कारणांसाठी चांदीची मोठी मागणी आहे. सौर ऊर्जा, इलेक्ट्रॉनिक्स, इलेक्ट्रिक मोबिलिटी आणि प्रगत उत्पादन क्षेत्रातील मागणीमुळे चांदीला अधिकाधिक दर मिळत आहे. चांदीच्या औद्योगिक महत्त्वामुळे दीर्घकाळ ही किंमत टीकून आहे, असे जाणकारांचे मत आहे.



*अमळनेर : घाऊक भाजीपाला बाजारात खरेदीसाठी झालेली व्यापाऱ्यांची गर्दी.* *(छायाचित्र : मयूर चौधरी)*

# अमळनेरला भाजीपाल्याची मोठी आवक

## बहुतांश भाज्यांचे दर स्थिर; मिरची, शेवग्याचे दर मात्र गगनाला!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : हिवाळ्याच्या पार्श्वभूमीवर येथील भाजी-पाल्याची आवक मोठ्या प्रमाणात वाढली आहे. परिणामी बहुतांशी भाज्यांचे दर स्थिर आहेत. मात्र, मिरची आणि शेवग्याचे दर चांगलेच कडाडले आहेत.

येथील भाजी- पाला बाजारात रोज सकाळी लिलाव होतो. त्यामुळे किरकोळ व्यापाऱ्यांची खरेदीसाठी मोठी गर्दी असते. यंदा विविध भागातून भाजी- पाला मोठ्या प्रमाणात उपलब्ध होत आहे. डिसेंबर व जानेवारी महिन्यात मोठी आवक असल्याने भाजी- पाला शिल्लक राहातो, असे भाजी- पाल्याचे होलसेल व्यापारी हरी महाजन यांनी दै. ग्लोबलशी बोलताना सांगितले.

### भाजीपाल्याचे किलोनिहाय दर असे

शेवगे : ६० ते ८० रुपये किलो., भरीत वांगे : २०- २५ रुपये, काकडी : १५- २०, जाड- बारीक मिरची : ५०- ६० रुपये, पोकळा : १०- १५ रुपये, कोथंबिर : २०- २५ रुपये, टमाटा : ४००- ४५० रुपये (प्रती कॅरेट), छोटे वांगे : २५०- २७० (प्रति कॅरेट), मुळा : १५- २० रुपये, वाल शेंगा : २०- २५ रुपये, गाजर : २०- २५ रुपये, बटाटा : १५- २० रूपये, चवळी : ४०- ५० रुपये, पालक : २०- ३० रुपये, मेथी : १०- २० रुपये, वटाणा : ४०- ५० रुपये, आद्रक : ६०- ७० रुपये, शिमला मिरची : ४०- ५० रुपये, भेंडी : ३० रुपये, लसूण : २४० ते ३०० रुपये, कांद्याची पात : ४०- ४५ रुपये, भोपळे : २०- २५ रुपये, मेथी : १०- २० रुपये, लाल कांदा : ५०० ते १६०० रुपये (प्रति क्विंटल). रताळे : २५ रुपये.

## ब्रिजवरून खाली पडल्याने रेल्वे कर्मचाऱ्याचा मृत्यू

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील रेल्वे स्थानकावर कामावर असलेले रेल्वे कर्मचारी देवेंद्र प्रभाकर गवाणे (वय ४३, ट्रॅक मेंटेनर २) यांचा ब्रिज क्रमांक ३०७ वरून खाली पडल्याने मृत्यू झाला. ही घटना शनिवार, दि. १७ जानेवारी रोजी सकाळी ७ वाजता निदर्शनास आली. ते खासगी पेट्रोलिंगवर असताना ठेकेदाराच्या एका कामगारासोबत असताना ही घटना घडली आहे. खाली पडल्यानंतर त्यांना एका खासगी रूग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, प्रकृती अधिक खालावल्याने त्यांना धुळे येथे हलविण्यात आले होते. उपचारा दरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

# शंभर रुपयात मिळेल रेल्वे स्थानकात रुम, वाचा कशी ?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



रेल्वे स्थानकात झोपण्याची सोय असते. यात एसी आणि नॉन एसी रुम, सिंगल, डबल बेड आणि डॉरमेट्रीची सुविधा असते. रिटायरिंग रूम तेच प्रवासी बुक करु शकतात ज्यांच्याकडे कन्फर्म वा आरएसी तिकीट असेल. वेटिंग लिस्ट तिकीटावर ही सुविधा मिळत नाही.

वैध पीएनआर नंबर असणे बंधनकारक असते. ही सुविधा देशाच्या बहुतांशी मोठ्या रेल्वे स्थानकात असते. आयआरसीटीसीच्या वेबसाईटवर पीएनआर टाकून याची उपबद्धता चेक करता येते. आयआरसीटीसीची रिटायरिंग रूम वेबसाईटवर पीएनआर टाकून लॉगिंग करावे लागते. स्टेशन आणि रूम टाईप निवडून यूपीआय, डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड वा नेट बँकींगने पैसे भरू शकता.

जर ऑनलाईन बुकिंग करु इच्छीत नसाल तर स्टेशनवर तिकीट काऊंटरवर जाऊन माहिती घेऊ शकता. रूम रिकामी असल्यावर तेथेच बुकींगची सुविधा मिळते. स्वच्छ बेड, एसी, बाथरुम, टॉवेल, साबण, पाणी, टीव्ही, टेबल खुर्ची आणि चहा- कॉफी बनवण्याची सुविधा मिळते. चेक इन बुकींगच्या एक तासात करावे लागले. भाडे रुमचा दर्जा आणि वेळेवर अवलंबून असते.

सर्वसाधारणपणे १२ ते २४ तासांसाठी बुकींग असते. खर्च सुमारे १०० रुपयांपासून सुरू होऊन ७०० रुपयांपर्यंत असतो. ऑनलाईन बुकींग केवळ ऑनलाईनच रद्द करता येते. रिफंड कमाल सात दिवसात मिळतो. कोणत्याही समस्येसंदर्भात स्टेशन अधिकारी किंवा सर्व्हीस प्रोव्हायडरशी थेट तक्रार करु शकता.

# 'आयएएस' अधिकाऱ्याचे टीम इंडियात पदार्पण!

## पहिल्याच सामन्यात ठोकले अर्धशतक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



आपल्या राष्ट्रीय संघात खेळण्याची संधी मिळावी असे स्वप्न प्रत्येक क्रिकेटरचे असते. भारतासारख्या देशात जिथे प्रत्येक दुसऱ्या मुलाला सचिन तेंडुलकर आणि विराट कोहली व्हावेसे वाटते अशा परिस्थितीत राष्ट्रीय संघात स्थान मिळविणे खूपच कठीण होऊन जाते. देशाच्या राष्ट्रीय संघाचे प्रतिनिधित्व करणे आणि भारतातील सर्वात कठीण परीक्षा असलेली यूपीएससी पास करणे या दोन्ही सामान्यांना जवळपास अशक्यच वाटतात.

यूपीएससीची परीक्षा पास करून तो आयएएस अधिकारी बनलेला आणि टीम इंडियात स्थान मिळवून भारताचे आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये प्रतिनिधित्व करणाऱ्याचे नाव अमय खुरासिया असे आहे. अमय यांनी १९९९ मध्ये श्रीलंकेच्या विरुद्ध भारताकडून पदार्पण केले होते. यापूर्वी त्यांनी यूपीएससीची परीक्षा सुद्धा उत्तीर्ण केली होती. अमय खुरासिया हे भारतीय सीमाशुल्क आणि केंद्रीय उत्पादन शुल्क विभागात निरीक्षक आहेत. (२२ फेब्रुवारी २०२५ पर्यंत). एवढेच नाही तर त्यांनी छोट्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत भारतासाठी १२ वनडे सामने देखील खेळले आहेत. अमय खुरासिया यांनी देशांतर्गत क्रिकेटमध्ये सुद्धा खूप धावा केल्या. त्यामुळेच त्याला राष्ट्रीय संघात संधी मिळाली. त्यावेळी डाव्या हाताचे फलंदाज म्हणून ते प्रसिद्ध होते. जे वेगवान धावा करायचे. त्यांनी त्यांच्या करिअरची सुरुवात सुद्धा दमदार केली होती. पदार्पणाच्या सामन्यात श्रीलंकेविरुद्ध वेगवान अर्धशतक झळकाविले होते.

आयुष्याच्या उत्तरार्धात त्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर संघर्ष करावा लागला. १९९९ च्या वर्ल्ड कप संघात त्यांचा समावेशही करण्यात आला. मात्र, ते एकही सामना खेळले नाही. भारतासाठी शेवटचा सामना हा जुलै २००१ मध्ये श्रीलंकेच्या विरुद्ध खेळला. त्यानंतर संघातून बाहेर करण्यात आले. पुन्हा कधीच त्याला संघाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली नाही.

अखेर त्यांनी एप्रिल २००७ मध्ये निवृत्ती घेण्याचा निर्णय घेतला. कोचिंगच्या माध्यमातून खेळात योगदान देईल, असा संकल्प केला. मध्य प्रदेशसाठी खेळताना खूप धावा केल्या. त्याने ११९ सामन्यांमध्ये ४०. ८ च्या सरासरीने ७ हजार ३०४ धावा केल्या. २१ शतके आणि ३१ अर्धशतकांचा समावेश आहे. त्यांनी ११२ लिस्ट ए सामने सुद्धा खेळले. ज्यात त्यांनी ३ हजार ७६८ धावा केल्या. यात चार शतके आणि २६ अर्धशतकांचा समावेश आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर, १३. ५४ च्या सरासरीने फक्त १४९ धावा करू शकले. ज्यामध्ये पदार्पणातच एक अर्धशतक झळकावले. यूपीएससी परीक्षा जिंकल्यानंतर त्यांनी हार मानली नाही. सध्या ते केरळ क्रिकेट संघाचे मुख्य प्रशिक्षक आहेत.

# एक लिटर समुद्राच्या पाण्यापासून किती मीठ तयार होते?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

एका लिटर समुद्राच्या पाण्यापासून किती मीठ मिळेल, हे त्या समुद्रातील क्षारतेवर अवलंबून असते. सर्वसाधारणपणे समुद्राच्या पाण्याची क्षारता ३. ५ टक्के असते. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.

सरासरी प्रमाण : एका लिटर समुद्राच्या पाण्यापासून साधारणपणे ३५ ग्रॅम मीठ तयार होते. जर आपण संपूर्ण महासागराचा विचार केला, तर त्यातील एकूण मिठाचे प्रमाण इतके आहे की त्याने संपूर्ण पृथ्वीवर ५०० फूट जाडीचा थर तयार होऊ शकतो.

पाण्याचे बाष्पीभवन : मीठ तयार करण्याची सर्वात जुनी आणि नैसर्गिक पद्धत म्हणजे बाष्पीभवन. समुद्राचे पाणी वाफ्यांमध्ये साठवले जाते आणि सूर्याच्या उष्णतेमुळे पाण्याची वाफ होऊन खाली मिठाचे खडे उरतात.

क्षेत्रानुसार फरक : सर्वच समुद्रात मिठाचे प्रमाण सारखे नसते. उदाहरणार्थ, मृत समुद्रामध्ये एका लिटर पाण्यात सुमारे ३०० ते ३४० ग्रॅम मीठ असते, जे सामान्य समुद्रापेक्षा १० पटीने जास्त आहे.



मिठातील घटक : समुद्राच्या पाण्यात केवळ खाण्याचे मीठ नसते. त्यात मॅग्नेशियम, कॅल्शियम आणि पोटॅशियमचे क्षारही असतात. शुद्धीकरणाच्या प्रक्रियेत यातील अनावश्यक क्षार काढून टाकले जातात.

शुद्धीकरण : वाफ्यातून मिळालेले कच्चे मीठ थेट खाण्यासाठी वापरता येत नाही. त्यात असलेली वाळू, चिखल आणि इतर खनिजे काढून टाकण्यासाठी त्यावर कारखान्यांमध्ये प्रक्रिया केली जाते आणि त्यात 'आयोडीन' मिसळले जाते.

# अमळनेर येथे विराट कुस्त्यांची दंगल उत्साहात

## पवन पहिलवान यांच्याकडून विजेत्यांना गदा भेट

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील राजे शिवाजी मित्र मंडळ, जय हिंद व्यायामशाळा, व प्रतापआबा मित्रपरिवारातर्फे रविवार, दि. १८ रोजी महाकुस्ती स्पर्धा झाल्या. सुरूवातीला हृदयरोगतज्ञ डॉ. संदीप जोशी यांच्या हस्ते हनुमानांची आरती झाली. पवन पहिलवान यांच्याकडून विजयी पहिलवानांना गदा भेट देण्यात आली.

माजी नगराध्यक्ष प्रभाकर पाटील, मंगळ ग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष तथा नगरसेवक डॉ. डिगंबर महाले, लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर, खानदेश शिक्षण मंडळाचे चेअरमन सीए नीरज अग्रवाल, नगरसेवक भरत ललवाणी, उपनगराध्यक्ष प्रशांत निकम, विजय बाविस्कर, गोपाल पाटील, माजी नगरसेवक संजय पाटील, नगरसेवक प्रताप साळी, माजी नगरसेवक विनोद लांबोळे, जय हिंद व्यायाम शाळेचे उपाध्यक्ष




*अमळनेर : विराट कुस्त्यांच्या दंगल प्रसंगी उपस्थित उपनगराध्यक्ष प्रशांत निकम, सीए नीरज अग्रवाल, भरतकुमार ललवाणी, जितू ठाकूर, प्रताप शिंपी, जीवन पवार, पवन शिंपी आदी.*

जिवन पवार, तालुका कुस्ती संघाचे अध्यक्ष बाळू पाटील, कॉन्ट्रॅक्टर गणेश ठाकूर, सचिन पाटील, संजय महाज, अमोल पाटील आदी मान्यवरांच्या हस्ते कुस्ती स्पर्धेला सुरूवात झाली. जय हिंद व्यायामशाळा व प्रतापआबा मित्रपरिवारातर्फे मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. राजे शिवाजी मित्र मंडळाचे कार्यवाहक जिजाबराव पाटील, दीपक चौधरी, हवालदार पिंटू शिंपी, हवालदार बबलू पाटील, भय्यासाहेब पाटील, पवन चौधरी, भैय्या पाटील, विकी पाटील, अमोल चौधरी, विनोद निकम, मधु चौधरी, सोनू पाटील, कुणाल पारधी, नरेंद्र पाटील, दिनकर बडगुजर, श्रीकृष्ण पाटील आदी उपस्थित होते. आयोजक पवन पहिलवाल यांनी विजयी पहिलवानांना गदा दिली. ट्रिपल महाराष्ट्र चॅम्पियन रावसाहेब पैलवान, संजू पहिलवान, माजी नगरसेवक प्रताप पहिलवान यांनी पंच म्हणून काम पाहिले. प्रवीण महाराज पहिलवान, निजामपूरचे शरद सूर्यवंशी यांनी कुस्ती समालोचक म्हणून काम पाहिले. राजे शिवाजी मित्र मंडळ व जय हिंद व्यायाम शाळेच्या सदस्यांनी सहकार्य केले.




# मंगळ गोचरने बनणार त्रिग्रही योग

## 'या' ५ राशींना मिळणार तिप्पट लाभ, कमाई वाढणार



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

श्री मंगळग्रहाने १६ जानेवारी रोजी पहाटे ४ वाजून २७ मिनिटांनी मकर राशीत प्रवेश केला. मंगळाने स्वतःच्या उच्च राशीत प्रवेश केला असल्याने रुचक राजयोग अधिक प्रभावी होईल. यावेळी मकर राशीत सूर्य आणि शुक्र हे ग्रह देखील मंगळासोबत आले आहेत. ज्यामुळे त्रिग्रह योग तयार झालेला आहे. ग्रहांच्या या शुभ संयोगामुळे मेष, कर्क आणि आणखी तीन राशींचे नशीब सद्यःस्थितीत बदलले आहे. या राशींना केवळ आर्थिक लाभच होणार नाही, तर त्यांच्या कामात प्रगती होईल आणि त्यांचा आत्मविश्वासही वाढेल. मंगळाच्या या गोचरामुळे कोणत्या राशींचे भाग्य उजळेल ते पाहूया.

### मेष राशी



मंगळाचे गोचर मेष राशीच्या लोकांसाठी त्यांच्या दहाव्या घरात होणार आहे. यामुळे कामातील उत्साह आणि ऊर्जा खूप वाढेल. जबाबदाऱ्याही वाढतील. पण त्याचबरोबर अनेक चांगल्या संधीही मिळतील. नोकरी करणाऱ्यांसाठी बढती मिळण्याची शक्यता आहे. जे लोक व्यवसाय करतात त्यांच्यासाठी हा काळ व्यवसायात वाढ करण्यासाठी खूप चांगला आहे. सरकारी कामांमध्येही चांगले यश मिळू शकते. या काळात कामात आणि वैयक्तिक आयुष्यात संतुलन राखणे महत्त्वाचे आहे.

**उपाय : मंगळवारी हनुमान चालिसाचे नियमित पठण करावे.**

### कर्क राशी



कर्क राशीच्या लोकांसाठी मंगळाचे गोचर त्यांच्या सातव्या घरात होणार आहे. यामुळे तुम्हाला भागीदारीत काम करताना चांगला फायदा होऊ शकतो. तुमच्या प्रेमसंबंधांसाठीही हा काळ खूप चांगला राहील. जे लोक अविवाहित आहेत त्यांना या काळात त्यांचा जोडीदार भेटण्याची शक्यता आहे. आपल्या जोडीदारासोबत भावनिकरित्या अधिक जोडलेले वाटेल. करिअर आणि नात्यांमध्ये स्थिरता येईल.

**उपाय : मंगळवारी आणि शनिवारी सुंदरकांडाचे पठण विशेषतः करा.**

### कन्या राशी



मंगळाचे गोचर कन्या राशीच्या लोकांसाठी त्यांच्या पाचव्या घरात होणार आहे. यामुळे नक्की जाणवेल की विचार अधिक मजबूत झाले आहेत. नात्यांमध्ये उत्साह आणि आत्मविश्वास वाढीस लागलेला आहे. व्यावसायिक जीवनासाठी हा काळ खूप उत्तम आहे. अहंकार टाळायला हवा. आर्थिक बाबतीत थोडी सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. नेतृत्व करण्याची किंवा मार्गदर्शन करण्याची संधीही मिळू शकते, जी आपण उत्तमप्रकारे पार पाडाल.

**उपाय : मंगळवारी लाल रंगाच्या आसनावर बसून 'ओम क्रां क्रीं क्रौं सः भौमाय नमः' या मंगळाच्या मंत्राचा १०८ वेळा जप करावा.**

### वृश्चिक राशी



वृश्चिक राशीच्या लोकांसाठी मंगळाचे गोचर त्यांच्या तिसऱ्या घरात होणार आहे. या काळात काही मोठे आणि निर्णायक निर्णय घेऊ शकता. मार्केटिंग, सेल्स, टीचिंग, सोशल मीडिया किंवा कम्युनिकेशनद्वारे व्यवसाय वाढविण्यासाठी नवीन प्रोजेक्ट सुरू करण्यासाठी हा एक उत्तम काळ आहे. आपल्या भावंडांशी असलेले नातेसंबंध सुधारतील. अभ्यासासाठी आपल्याला कदाचित प्रवास करावा लागू शकतो. या काळात स्वतःला खूप आत्मनिर्भर वाटेल. या गोचर दरम्यान अनेक धाडसी पावले उचलू शकाल.

**उपाय : मंगळवारी हनुमानजींच्या मंदिरात जाऊन चमेलीच्या तेलाचा दिवा लावा.**

### मकर राशी



मकर राशीत मंगळाचे गोचर पहिल्या घरात म्हणजेच लग्न स्थानात होणार आहे. राशीत मंगळ, सूर्य आणि बुध हे तीन ग्रह एकत्र असतील. मंगळाच्या या प्रवेशामुळे रुचक राजयोग प्रभावी होईल. यामुळे मकर राशीच्या लोकांमध्ये एक वेगळाच आत्मविश्वास दिसून येईल. आपण स्वतःला सिद्ध करण्यात यशस्वी व्हाल. नात्यांमध्येही अधिक दृढता येईल. करिअरशी संबंधित धाडसी निर्णय घेऊ शकाल. ज्याचा आपल्याला भविष्यात नक्कीच फायदा होईल.

**उपाय : लाल रंगाचे वस्त्र दान करा किंवा गरजू लोकांना मूगडाळीचे दान करा.**

# कोहळा कसा व कधी बांधावा?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

घराजवळ मारुतीचे मंदिर असल्यास कोहळा बांधण्याची पद्धत...

**१) कोहळा निवड**
चांगला, मोठा आणि निरोगी कोहळा निवडावा.

**२) लाल कापड**
कोहळ्याला लाल रंगाच्या कापडात गुंडाळावा.

**३) पूजा**
कापडात गुंडाळलेल्या कोहळ्याची पूजा करावी. ॐ किंवा स्वस्तिक काढावा.

**४) बांधणे**
कोहळा घराच्या मुख्य दरवाजावर किंवा प्रवेशद्वारावर बांधावा.

**५) गाठी**
कोहळ्याला तीन गाठी माराव्यात.

**६) सूर्यास्तानंतर**
शक्यतो सूर्यास्तानंतर कोहळा बांधावा.

**७) शनिवारी किंवा अमावास्या**
शनिवारी किंवा अमावास्येला कोहळा बांधणे शुभ मानले जाते.



**कोहळा का बांधतात?**

वाईट शक्ती, नकारात्मक ऊर्जा आणि दृष्ट लागण्यापासून घराचे संरक्षण करण्यासाठी कोहळा बांधला जातो. घरात किंवा व्यवसायाच्या ठिकाणी नकारात्मक ऊर्जा येऊ नये, यासाठी घराच्या मुख्य दरवाजावर कोहळा बांधतात.

असे मानले जाते, की कोहळा नकारात्मक शक्तींना आपल्या घरात किंवा व्यवसायात प्रवेश करण्यापासून रोखतो. जर बांधलेला कोहळा लवकर खराब झाला, तर ती वाईट शक्तींचा नाश झाल्याचे चिन्ह मानले जाते.

# श्री धर्मनाथ बीज विशेष

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

माघ महिन्यातील द्वितीयेला श्री धर्मनाथ बीज असे म्हणतात. या तिथीला नाथपंथात विशेष महत्व आहे. या पार्श्वभूमीवर मंगळवार, दि. २० जानेवारी रोजी धर्मनाथ बीजनिमित्त विशेष!

या दिवशीं श्री गोरक्षनाथांनी धर्मनाथास अनुग्रह देऊन दीक्षा दिली. व त्या वेळेस सर्व देवी देवतांना आमंत्रित केले होते. तसेच प्रयाग क्षेत्रातील सर्व नगरवासी लोकांचाहि मोठा मेळा जमला होता. यादिवशी भव्य अन्नदान (भंडारा)झाला व श्री गोरक्षनाथांनी आपल्या हातांनी सर्वांना प्रसाद दिला होता. यामुळे सर्वांना अतिशय आनंद झाला. व देवांसह सर्वांनी दरसाल असाच उत्सव होऊन प्रसाद मिळावा अशी ईच्छा प्रगट केली.

श्री गोरक्षनाथांनी "धर्मनाथबीजेचा" उत्सव प्रतिवर्षी करण्याची त्रिविक्रमास आज्ञा दिली. तेव्हां सर्वास आनंद झाला व दरसाल या दिवशीं उत्सव होऊं लागला. श्री गोरक्षनाथानी आपल्या 'किमयागिरी' नामक ग्रंथांत असें लिहिलें आहे कीं. आपापल्या शयनुसार जो कोणी हें बीजेचें व्रत करील त्याच्या घरीं दोष, दारिद्र्य, रोग आदिकरुन विघ्नें स्वप्नांत देखील यावयाची नाहींत. त्या पुरुषांचा संसार सुनियंत्रित चालेल. प्रत्यक्ष लक्ष्मी त्याच्या गृहीं वास्तव्य करील. याप्रमाणें धर्मनाथ बीजेचा महिमा होय.

**धर्मनाथ बीज उत्सव असा साजरा करावा**

आपल्या घरी अथवा नाथांचे मंदिर असेल तर त्याठिकाणी श्री नवनाथांचे प्रतिमेचे पुजन करावे. हार-पुष्प अर्पण करावे. धुप-दिप दाखवावा. व श्री नवनाथ भक्तीसार ग्रंथातील ३४ वा अध्याय पठण करावा. अथवा संक्षिप्त नवनाथ पारायण करावे. ज्यांच्या घरी नवनाथांचा फोटो नसेल त्यानी नवनाथ ग्रंथाचे पंचोपचार पूजन करून नैवेद्य दाखवावा.

नैवेद्य दाखवुन नाथांची आरती करावी. व यथाशक्ती अन्नदान करावे. ज्यांना शक्य असेल त्यांनी ज्वारीच्या पिठाचे आंबील, घेवड्याची भाजी, हरबर्‍याच्या घुगर्‍या, मलिदा, वडे, ई. नैवद्यही अर्पण करु शकता.

**धर्मनाथ बीजेची कथा**

राजा त्रिविक्रमाच्या मृत्युपश्चात स्मशानात शोकाकुल प्रजेला पाहून गोरक्षनाथ हळहळले. त्यांच्या हट्टापायी महागुरू योगी मच्छिंद्रनाथ ह्यांनी त्रिविक्रम राजाच्या शरीरात प्रवेश करून राणी रेवती बरोबर १२ वर्षे संसार केला आणि प्रजेचे पालनही केले. रेवती राणीस मच्छिंद्रनाथ अंशरुपी पुत्राची पाप्ती झाली ज्यांचे नाव "धर्मनाथ" ठेवण्यात आले.

१२ वर्षांचा कालावधी संपल्यावर योगी मच्छिन्द्रनाथानी त्रिविक्रम राजाच्या देहाचा त्याग करून पुन्हा मूळरुपात आले, परंतु हे रहस्य रेवती राणीस कळले होतेच. तिने आपल्या पुत्राला, धर्मनाथ ह्यास त्याच्या खऱ्या जन्मदात्याची ओळख करवून दिली. त्यावेळी मच्छिंद्रनाथ ह्यांनी आशीर्वाद दिला की १२ वर्षे राज्य केल्यानंतर गोरक्षनाथ ह्याचे कडून धर्मनाथ ह्यास नाथपंथ दीक्षा दिली जाईल आणि तो नाथपंथात वाढीस लागेल.

१२ वर्षांनी "माघ शुद्ध द्वितीया" ह्या दिवशी गोरक्षनाथ ह्यांनी धर्मनाथास नाथपंथाची दीक्षा दिली. तो सोहळा इतका अमुल्य झाला होता कि गोरक्षनाथ ह्यांनी सर्व प्रजेसमोर घोषणा केली की, जो कुणी यथाशक्ती ह्या द्वितीयेच्या दिनी दान धर्म, पुण्य कर्म करील, त्याचे सर्वतोपरी नाथ कल्याण करतील. त्याचे घरी सुख, शांती, धन संपदा नांदू लागेल व त्याचे मार्ग सुकर होतील. हा सोहळा "धर्मनाथ बीज" ह्या उत्सवाने ओळखला जातो.

किमयागिरी' नामक ग्रंथांत असें लिहिलें आहे कीं. आपापल्या शक्तिनुसार जो कोणी हें बीजेचें व्रत करील त्याच्या घरीं दोष, दारिद्र्य, रोग आदिकरुन विघ्नें स्वप्नांत देखील यावयाची नाहींत. त्या पुरुषांचा संसार सुयंत्रित चालेल प्रत्येक्ष लक्ष्मी त्याच्या गृहीं वास्तव्य करील. याप्रमाणें धर्मनाथ बीजेचा महिमा होय.

# हनुमान चालिसामध्ये दडले आहे रोग-दोष निवारणाचे रहस्य!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू धर्मातील प्रत्येक दिवस कोणत्या ना कोणत्या देवतांना समर्पित आहे, त्याचप्रमाणे मंगळवार हा हनुमानजींना समर्पित आहे. असे मानले जाते, की मंगळवारी संकटमोचन पूजन केल्याने तुमचे सर्व संकट दूर होतात. यासोबतच जर तुम्ही रोग-ग्रह-दोषांमुळे त्रस्त असाल किंवा यश सतत घसरत असेल, तुमच्या प्रगतीत काही अडथळे येत असतील, तर तुम्ही मंगळवारी हनुमान चालिसाचे पठण अवश्य करा, त्याचा तुम्हाला नक्कीच फायदा होईल. तुम्हाला यश मिळेल. नशीब चमकेल. दररोज हनुमान चालिसाचे पठण केल्याने आपल्या जीवनातील सर्व दुःख आणि दुःख दूर होतात. प्रत्येक संकटातून आपण बाहेर पडतो. आपल्या शरीराला निरोगी ठेवण्याचे रहस्य देखील हनुमान चालिसामध्ये दडलेले आहे, आज आम्ही तुम्हाला तेच सांगत आहोत. चला तर मग जाणून घेऊया हनुमान चालिसाच्या पाठाबद्दल.

**दोहा :**

श्रीगुरु चरन सरोज रज, निज मनु मुकुरु सुधारि।
बरनऊँ रघुबर बिमल जसु, जो दायकु फल चारि॥
बुद्धिहीन तनु जानिके, सुमिरौं पवन-कुमार।
बल बुद्धि बिद्या देहु मोहिं, हरहु कलेस बिकार॥

**चौपाई :**

जय हनुमान ज्ञान गुन सागर।
जय कपीस तिहुँ लोक उजागर॥
रामदूत अतुलित बल धामा।
अंजनि-पुत्र पवनसुत नामा॥
महाबीर बिक्रम बजरंगी।
कुमति निवार सुमति के संगी॥
कंचन बरन बिराज सुबेसा।
कानन कुंडल कुंचित केसा॥
हाथ बज्र औ ध्वजा बिराजै।
काँधे मूँज जनेऊ साजै।
संकर सुवन केसरीनंदन।
तेज प्रताप महा जग बन्दन॥
विद्यावान गुनी अति चातुर।
राम काज करिबे को आतुर॥
प्रभु चरित्र सुनिबे को रसिया।
राम लखन सीता मन बसिया॥
सूक्ष्म रूप धरि सियहिं दिखावा।
बिकट रूप धरि लंक जरावा॥
भीम रूप धरि असुर सँहारे।
रामचंद्र के काज सँवारे॥
लाय सजीवन लखन जियाये।
श्रीरघुबीर हरषि उर लाये॥
रघुपति कीन्ही बहुत बड़ाई।
तुम मम प्रिय भरतहि सम भाई॥
सहस बदन तुम्हरो जस गावैं।
अस कहि श्रीपति कंठ लगावैं॥
सनकादिक ब्रह्मादि मुनीसा।
नारद सारद सहित अहीसा॥
जम कुबेर दिगपाल जहाँ ते।
कबि कोबिद कहि सके कहाँ ते॥
तुम उपकार सुग्रीवहिं कीन्हा।
राम मिलाय राज पद दीन्हा॥
तुम्हरो मंत्र बिभीषन माना।
लंकेस्वर भए सब जग जाना॥
जुग सहस्र जोजन पर भानू।
लील्यो ताहि मधुर फल जानू॥
प्रभु मुद्रिका मेलि मुख माहीं।
जलधि लाँघि गये अचरज नाहीं॥
दुर्गम काज जगत के जेते।
सुगम अनुग्रह तुम्हरे तेते॥
राम दुआरे तुम रखवारे।
होत न आज्ञा बिनु पैसारे॥
सब सुख लहै तुम्हारी सरना।
तुम रक्षक काहू को डर ना॥
आपन तेज सम्हारो आपै।
तीनों लोक हाँक तें काँपै॥
भूत पिसाच निकट नहिं आवै।
महाबीर जब नाम सुनावै॥
नासै रोग हरै सब पीरा।
जपत निरंतर हनुमत बीरा॥
संकट तें हनुमान छुड़ावै।
मन क्रम बचन ध्यान जो लावै॥
सब पर राम तपस्वी राजा।
तिन के काज सकल तुम साजा।
और मनोरथ जो कोई लावै।
सोइ अमित जीवन फल पावै॥
चारों जुग परताप तुम्हारा।
है परसिद्ध जगत उजियारा॥
साधु संत के तुम रखवारे।
असुर निकंदन राम दुलारे॥
अष्ट सिद्धि नौ निधि के दाता।
अस बर दीन जानकी माता॥
राम रसायन तुम्हरे पासा।
सदा रहो रघुपति के दासा॥
तुम्हरे भजन राम को पावै।
जनम-जनम के दुख बिसरावै॥
अन्तकाल रघुबर पुर जाई।
जहाँ जन्म हरि-भक्त कहाई॥
और देवता चित्त न धरई।
हनुमत सेइ सर्ब सुख करई॥
संकट कटै मिटै सब पीरा।
जो सुमिरै हनुमत बलबीरा॥
जै जै जै हनुमान गोसाईं।
कृपा करहु गुरुदेव की नाईं॥
जो सत बार पाठ कर कोई।
छूटहि बंदि महा सुख होई॥
जो यह पढ़ै हनुमान चालीसा।
होय सिद्धि साखी गौरीसा॥
तुलसीदास सदा हरि चेरा।
कीजै नाथ हृदय मँह डेरा॥

**दोहा :**

पवनतनय संकट हरन, मंगल मूरति रूप।
राम लखन सीता सहित, हृदय बसहु सुर भूप॥



# गणपती बाप्पाच्या जन्मोत्सवाचा शुभ मुहूर्त

## तिथी, धार्मिक आणि वैज्ञानिक महत्त्व

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

गणपती बाप्पा हे अवघ्या महाराष्ट्राचे आणि हिंदू संस्कृतीचे आराध्य दैवत. बुद्धीची देवता आणि विघ्नहर्ता मानल्या जाणाऱ्या गणेशाचा खरा जन्मोत्सव हा माघ शुद्ध चतुर्थीला साजरा केला जातो. यंदा म्हणजेच २०२६ मध्ये हा शुभ दिवस गुरुवार, २२ जानेवारी रोजी येत आहे. गणेश जयंतीला 'विनायक चतुर्थी', 'तिलकुंद चतुर्थी' किंवा 'वरद चतुर्थी' अशा विविध नावांनी ओळखले जाते. धार्मिक मान्यतेनुसार याच तिथीला गणपती बाप्पांचा जन्म झाला होता. ज्यामुळे या दिवसाला 'माघी गणेश जयंती' असे संबोधले जाते.

### २०२६ चा तिथी आणि पूजेचा शुभ मुहूर्त

माघी गणेश जयंतीच्या पूजेसाठी शास्त्रात 'माध्याह्न' वेळ अत्यंत महत्त्वाची मानली जाते. गुरुवार, २२ जानेवारी २०२६ रोजी चतुर्थी तिथी पहाटे ०२:४७ वाजता सुरू होईल आणि शुक्रवार, दि. २३ जानेवारीला पहाटे ०२:२८ वाजता समाप्त होईल. बाप्पांच्या पूजेसाठी सर्वांत शुभ मुहूर्त सकाळी ११:२९ ते दुपारी ०१:३७ पर्यंत असेल. या काळात श्रीगणेश यांची प्राणप्रतिष्ठा किंवा विशेष पूजा-अर्चा करणे अत्यंत फलदायी ठरते. विशेष म्हणजे या दिवशी चंद्रदर्शन टाळण्याचा सल्ला दिला जातो. कारण माघी चतुर्थीचे चंद्रदर्शन केल्यास खोटा कलंक लागण्याची शक्यता असते, असे पौराणिक कथांमधून सांगितले जाते.

### तिळाच्या लाडवांचा नैवेद्य आणि आरोग्याचा संबंध

भाद्रपदातील गणेशोत्सवात आपण बाप्पांना उकडीच्या मोदकांचा नैवेद्य दाखवितो. मात्र माघी गणेश जयंतीला 'तिळाच्या लाडवांचे' विशेष महत्त्व असते. जानेवारी महिन्यात येणारी ही चतुर्थी कडाक्याच्या थंडीत येते. विज्ञानाच्या दृष्टीने तीळ आणि गूळ हे उष्णतावर्धक असून शरीराला ऊर्जा देतात. म्हणूनच या दिवसाला 'तिलकुंद चतुर्थी' असेही म्हणतात. या दिवशी बाप्पांना तिळाचा नैवेद्य दाखवून तो प्रसाद म्हणून ग्रहण केल्याने आरोग्याचे रक्षण होते आणि मनाला शांती मिळते, अशी भावना भाविकांमध्ये असते.



### गणेश जयंती आणि गणेश चतुर्थीमधील नेमका फरक

अनेकांमध्ये गणेश जयंती आणि गणेश चतुर्थी या दोन सणांबाबत संभ्रम असतो. भाद्रपद महिन्यात साजरी होणारी 'गणेश चतुर्थी' ही मुख्यत्वे पार्थिव गणेश पूजन आणि गणपती बाप्पांचे उपनयन संस्कार (मुंज संस्कार) याच्याशी तसेच लोकमान्य टिळकांनी सुरू केलेल्या सार्वजनिक उत्सवाशी जोडलेली आहे. तर माघ महिन्यातील 'गणेश जयंती' ही साक्षात गणपती बाप्पांचा जन्मदिन म्हणून साजरी होते. माघ महिन्यातील या तिथीला गणेश लहरी पृथ्वीवर सहस्त्रपटीने कार्यरत असतात. ज्यामुळे या दिवशी केलेले 'गणेश अथर्वशीर्ष' पठण किंवा 'ओम गं गणपतये नमः' या मंत्राचा जप विशेष फलदायी मानला जातो. अष्टविनायक आणि कोकणातील मंदिरांमध्ये या दिवशी मोठा उत्सव असतो.

भाद्रपद चतुर्थीप्रमाणे माघ महिन्यातील चतुर्थी म्हणजेच गणेश जयंती सार्वजनिक पद्धतीने साजरी करण्याची पद्धत अलीकडे सुरू झाली आहे. पूर्वी हा उत्सव केवळ मंदिरांपुरता मर्यादित होता. आता हा उत्सव सार्वजनिक गणेशोत्सवाच्या स्वरूपात साजरा होऊ लागला आहे. मोठ्या सार्वजनिक मिरवणुका नसल्या तरी उत्सवाचे स्वरूप अधिक व्यापक झाल्याचे दिसून येत आहे. या सणामुळे लोकांमध्ये येत्या काळात पवित्र भक्तीमय चैतन्य निर्माण होईल. बाप्पाच्या जन्मोत्सवानिमित्त घरोघरी रांगोळ्या, फुलांची सजावट आणि आरत्यांचे स्वर ऐकायला मिळतील. आपल्या आयुष्यातील संकटे दूर करून सुखाचा मार्ग दाखवण्यासाठी हा 'विघ्नहर्ता' नेहमीच सज्ज असतो.